**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड- 422101**

**दुरध्वनी क्र. 0253-2461439** **Email dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव- नियोजन शाखा** **संकलन- निशा- सिंहस्थ कुंभमेळा.**

प्रति,

1. मा. मुख्य अभियंता,
   उत्तर महाराष्ट्र प्रदेश कार्यालय, जलसंपदा विभाग, नाशिक.
2. मा.अधीक्षक अभियंता (ला.क्षे.वि.प्रा. नाशिक),
   जलसंपदा विभाग, नाशिक.
3. कार्यकारी अभियंता (नाशिक पाटबंधारे विभाग),
   जलसंपदा विभाग, नाशिक.

विषय:- दिनांक 09.06.2025 रोजी सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत गोदावरी नदीला वाहते पाणी असण्याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

महोदय/ महोदया,

त्र्यंबकेश्वर येथे 2027 च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या वेळी आणि इतर वेळी गोदावरी नदीला वाहते पाणी असण्याबाबत दिनांक 09.06.2025 रोजी सायंकाळी 06:00 मा. विभागीय आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांनी बैठकीत दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा ही विनंती.

आपला विश्वासू
Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 11-06-2025 15:30:04
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

सोबत- वरिलप्रमाणे.

प्रत माहितीस्तव.

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मुख्याधिकारी, नगर परिषद, त्र्यंबकेश्वर.

सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत गोदावरी नदीला वाहते पाणी असण्याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

त्र्यंबकेश्वर येथे 2027 च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या वेळी आणि इतर वेळी गोदावरी नदीला वाहते पाणी असण्याबाबत दिनांक 09.06.2025 रोजी सायंकाळी 06:00 विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे. त्यावेळी पुढीलप्रमाणे दोन योजनांची चर्चा झाली.

1. गौतमी गोदावरी धरण आणि किकवी नदी यातील पाण्याचा उपसा करून पाणी गंगासागर तलाव आणि अहिल्या तलावामार्फत गोदावरी नदीत सोडणे.

2. तळेगाव आणि काचुर्ली जलाशयातील पाणी त्र्यंबकेश्वर पर्यंत आणून गोदावरी नदीत सोडणे.

पहिला पर्याय करावयाचा झाल्यास त्र्यंबकेश्वर शहराची प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेचे बरेच काही उपांगे जलसंपदा विभागाच्या प्रस्तावामध्ये समाविष्ट होतील आणि त्यामुळे पाणीपुरवठा योजनेचा भांडवली खर्च कमी होईल. याबाबत अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले.

1. अशा प्रकारची योजना करीत असताना केवळ कुंभमेळा/ आणि पावसाळा कालावधीच नव्हे तर वर्षभर नदीतून पाणी सोडण्यासाठी दोन्ही पर्यायांची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहणे आवश्यक आहे. गौतमी गोदावरी धरणाची क्षमता पाहता तेथे उन्हाळा संपेपर्यंत या कामी पुरेसे पाणी उपलब्ध असण्याची शक्यता आहे. तथापि काचुर्ली आणि तळेगाव जलशयातील पाणी पावसाळा संपल्यानंतर स्थानिक शेतीसाठी पाणी देणे आणि बाष्पीभवन पाहता उन्हाळा अखेरपर्यंत दरमहा साधारणतः किती पाणी उपलब्ध होईल याचा स्पष्ट अंदाज द्यावा.

2. गोदावरी नदीत धार्मिक विधीसाठी किती क्युसेक्स पाण्याचा प्रवाह आवश्यक राहील, तो किती तास प्रतिदिन करता येईल? याचा अंदाज घेऊन प्रतिदिन किती घनफळ पाणी नदीत सोडणे आवश्यक आहे, याचा अंदाज द्यावा.

3. वरीलप्रमाणे अंदाज केल्यानंतर त्यामुळे वर्षातून किती दिवस पाणी दोन्ही प्रकारच्या प्रस्तावात नदीत सोडता येईल याचा अंदाज द्यावा. विशेषतः पावसाळा संपल्यानंतर आणि पावसाळ्यातील ड्राय स्पेल मध्ये.

पर्याय क्रमांक एकच्या बाबतीत नगरपालिका, त्र्यंबकेश्वरच्या तांत्रिक अधिकारी आणि सल्लागारांसोबत सल्लागारांचे मतं पाहून त्यांच्या पाणीपुरवठा योजनेमध्ये काय बदल करावे लागतील आणि त्यामुळे होणारा अभियांत्रिकी आणि आर्थिक बदल याची माहिती द्यावी. वरील प्रमाणे दोन्ही पर्यायांबाबत स्पष्ट आकडेवारीसह प्रस्ताव चर्चेसाठी आणि उचित निर्णयासाठी सादर करावा.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 11-06-2025 12:35:52

(डॉ. प्रवीण गेडाम)
विभागीय आयुक्त, नाशिक.

# बैठकीस उपस्थितांची यादी

| अ.क्र | नाव, पदनाम व कार्यालय | संपर्क क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रकाश मिसाळ, मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश कार्यालय, जलसंपदा विभाग, नाशिक | 8888807650 | cenmr.nashik@wrd.maharashtra.gov.in |
| 2 | श्री. र. ब. गोवर्धने, अधीक्षक अभियंता, (ला.क्षे.वि.प्रा. नाशिक) जलसंपदा विभाग, नाशिक | 99229 40041 | secadnsk@gmail.com |
| 3 | श्री. योगेंद्र चौधरी, उपआयुक्त (नियोजन), नाशिक | 7387923124 | dycomplan.nashik@maharashtra.gov.in |
| 4 | श्रीमती सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता, (नाशिक पाटबंधारे विभाग) जलसंपदा विभाग, नाशिक | 94220 62709 | eenidnasik@gmail.com |